**निशाणी क्र. १७ खाली आदेश**

**(पारित दिनांक १४.०३.२०२४)**

प्रतिवादीच्या वकीलांनी सदरचा अर्ज दिनांक १५.०२.२०२४ रोजी दाखल केला असून वादीचा दावा खारीज करण्याची विनंती केली आहे. त्यांच्या कथनानुसार, प्रकरणात नि.क्र.३० नुसार दिनांक २७.०६.२०२३ रोजी मुददे स्थापित करण्यात आले आहे. मुददयानुसार वादीने पुरावा देणे क्रमप्राप्त आहे. प्रकरण पुराव्याला लागल्यानंतर वादींना दिनांक ३१.०७.२०२३, ३१.०८.२०२३, ३१.०९.२०२३, १९.१०.२०२३, ३०.११.२०२३, ११.०१.२०२४ आणि ०१.०२.२०२४ प्रमाणे संधी देण्यात आली होती. वादी पुरावा दाखल करण्यास असमर्थ ठरले. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका १७ नियम ०१ नुसार जास्तीत जास्त तीन संधी देता येतात. मागील तारखेस वादी गैरहजर होते आणि वेळ मिळण्याचा अर्ज सुध्दा नव्हता. आजरोजी म्हणजेच १५.०२.२०२४ रोजी वादींनी पुरावा दाखल केलेला नाही. वादीला वेळ देण्याचे प्रावधान कायदयात नसल्याने वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका XVII नियम ०२ व ०३ प्रमाणे वादीचा दावा खारीज करण्याची विनंती केली.

**०२** याउलट वादींच्या वकीलांनी सदर अर्जास सक्त विरोध दर्शवून कथन केले की, वादीतर्फे पुराव्याचे शपथपत्र दिनांक १५.०२.२०२४ रोजीच दाखल केले असून त्यासोबतच वादीचा पुरावा बंद आदेश रदद करण्याचा अर्ज सुध्दा दाखल केलेला आहे. वादी हे पुरावा देण्यास तयार असल्याने सदरचा अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

**०३** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा १७.०२.२०२१ रोजी ताबा मिळण्याकरीता व अनुचित लाभ मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादींनी नि.क्र.१२ खाली लेखी जवाब दाखल केला. त्यानंतर प्रकरणात नि.क्र.१३ वर दिनांक २७.०६.२०२३ रोजी मुद्दे काढण्यात आले. त्यानंतर वादींना पुरावा दाखल करण्यास संधी दिल्यानंतर नि.क्र.१५ व नि.क्र.१६ वरील अर्ज नामंजूर करण्यात आले. त्यानंतरही पुरावा न आल्याने दिनांक ११.०१.२०२४ रोजी वादीचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर दिनांक १५.०२.२०२४ रोजी प्रतिवादीतर्फे सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्याच रोजी वादीतर्फे नि.क्र.१८ वरील अर्ज पुरावा बंद आदेश रदद करण्यासाठी

दाखल करण्यात आला आहे.

**<u>०४</u>** जरी प्रतिवादींनी मागील तारखेस वादी हजर नसतांना व वेळ मिळण्याचा अर्ज दाखल नसतांना वेळ दिल्याचे म्हटले असले तरी प्रकरणात दिनांक ११.०१.२०२४ रोजीच वादीचा पुरावा बंद करण्यात आला असून प्रकरण प्रतिवादींच्या पुराव्याकरीता ठेवण्यात आले होते. त्यानंतर दिनांक ०१.०२.२०२४ रोजी प्रतिवादींतर्फे पुरावा दाखल केला नव्हता किंवा वेळ मिळण्याचा अर्ज सुध्दा दाखल केला नव्हता. तसेच सदरचा अर्ज दिनांक १५.०२.२०२४ रोजी दाखल केला असून त्याच रोजी वादीने पुरावा बंद आदेश रदद होउन मिळण्याचा अर्ज दाखल केला असून सोबतच पुराव्याचे शपथपत्र सुध्दा दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रकरणाचे स्वरुप व सदयस्थिती बघता प्रकरणाचे गुणदोषावर निराकरण होण्याकरीता अभिलेखावर पुरावा येणे आवश्यक आहे. अभिलेखावर सदर अर्ज दाखल करण्यापूर्वी कोणताही पुरावा आलेला नसल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका XVII नियम ०२ व ०३ प्रमाणे प्रकरण निकाली काढण्यासाठी पुरावा नसल्याने अभिलेखावरील पुरावा गृहित धरुन प्रकरण निकाली काढणे योग्य होणार नाही. तसेच वादीतर्फे पुरावा बंद आदेश रदद करण्याचा अर्ज दाखल असून पुराव्याचे शपथपत्र सुध्दा दाखल असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका IX नुसार दावा खारीज करणे सुध्दा योग्य ठरणार नसलयाने प्रकरणाची सदयस्थिती व स्वरुप बघता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

सदरचा अर्ज या घडीला नामंजूर करण्यात येत आहे.

स्वा/-

(यो.द. कोईनकर)

दिनांकः १४.०३.२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H.A.Uchade (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 14.03.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 14.03.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 14.03.2024 |